# दंतशल्य चिकित्सक पदांबाबत महत्वाची घोषणा

आयोगामार्फत दंत शल्यचिकित्सक, सामान्य राज्य सेवा, गट-ब. ( जाहिरात क्रमांक ८७/२०१५ ) या पदाच्या १८९ जागांकरीता दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. प्रस्तुत पदाच्या जाहिरातीतील परिच्छेद क्रमांक ४.९ अन्वये सदर पदासाठी नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारास खाजगी व्यवसाय करता येणार नाही परंतु त्यासंदर्भात नियमानुसार व्यवसाय भत्ता अनुज्ञेय राहील असे नमूद करण्यात आले होते. तथापि, सदर पदासाठी व्यवसाय भत्ता देय अनुज्ञेय राहणार नाही असे अभिप्राय शासनाकडून प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर पदासाठी नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारास खाजगी व्यवसाय करता येणार नाही तसेच त्यासंदर्भात व्यवसाय भत्ता देखील अनुज्ञेय राहणार नाही याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

प्रस्तुत पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या यादीसह मुलाखतीच्या कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in वेबसाईटवर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल. तसेच मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक, ठिकाण व वेळ इत्यादी माहितीसह मुलाखतपत्र पाठविण्यात येतील. तसेच याबाबत संबंधित उमेदवारांच्या मोबाईल क्रमांकावर SMS द्वारे कळविण्यात येईल.

श्री. प्रदिपकुमार य. भुर्के
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण:मुंबई
दिनांक: १ डिसेंबर, २०१५